Estd: 1962
"A" Re-accredited by NAAC(2014)
With CGPA 3.16

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE: 0231-2609067, 2609068
GRAM: UNISHIVAJI o FAX : 0091-0231-2690655
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-416004 महाराष्ट्र
दूरध्वनी : 0231-2609067, 2609068 फॅक्स : 0091-0231-2690655
वेबसाईट : www.unishivaji.ac.in / e-mail : coe@unishivaji.ac.in

जा.क्र. : शिवाजी वि./परीक्षा नियंत्रक कार्यालय/4097 दिनांक : 07th Dec, 2015.

# परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित वास्तुशास्त्र महाविद्यालये.

विषय:- वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या चतुर्थ वर्ष प्रवेश व परीक्षा अर्जाबाबत...

महोदय,

वास्तुशास्त्र अभ्यासक्रम हा पाच वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम असून हा वार्षिक पध्दती मधून सत्र पध्दतीमध्ये २०१०-२०११ मध्ये परावर्तित झाला आहे हे आपणांस अवगत आहेच. सदर अभ्यासक्रम हा सत्र पध्दतीने अमंलात आणते वेळी सर्व नियम हे इतर सर्व सत्र अभ्यासक्रमांच्या पध्दतीच्या नियमाप्रमाणे संयुक्तिक ठरावेत अशा पध्दतीची निश्चित धारणा होती. तथापि वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाची काही वेगळी वैशिष्टये असल्यास ती विचारामधे घेऊन त्याकरीताची वेगळी नियमावली करण्यासंबंधीची बाब संबंधित अभ्यासमंडळे, विद्याशाखा यांच्याकडून विहित करण्यात आल्याचे निदर्शनास येत नाहीत. त्यामुळे बहुतांशी वेळा वार्षिक अभ्यासक्रमाकरीता अमंलात आलेल्या नियमावलीचा वापर सत्रपध्दतीकरीता केला जातो हे आक्षेपार्ह व नियमबाहय आहे. तथापी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन प्रशासनाकडून काही सवलती देण्यात आल्या होत्या. उदा. तृतीय वर्ष ( पाचवे व सहावे सत्र) पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांचा निकाल काही जरी लागला तरी चर्तुथ वर्षाकरीता (सत्र सातवे )परीक्षा अर्ज भरु दिला जात असे. वस्तुत: ही बाब नियमबाहय आहे. सर्व सत्रपध्दतीच्या परीक्षांकरीता अमंलामध्ये असलेली (On Line) प्रणाली ज्यायोगे , नोंदणी, परीक्षा अर्ज व त्यानुसार परीक्षा पूर्व कागदपत्रे जसे परीक्षा कक्ष अनुमती पत्रे (Hall Ticket), विषय, समरी इ. बाबी वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाकरीता सुध्दा लागू आहेत. त्याकरिता संगणक प्रणालीमधे नियमावलीचा अंतर्भाव करणेत आलेला आहे. यास्तव तृतीय वर्ष /उत्तीर्ण/ए.टी.के.टी. असल्याखेरीज चर्तुर्थ वर्षाकरीता प्रवेश (सत्र-७) व त्या अनुषंगाने परीक्षा अर्ज भरण्याकरीता विद्यार्थी पात्र असणार नाही असे अभिप्रेत असून ही सत्र पध्दतीची नियमावली आहे. या नियमावलीप्रमाणे चर्तुथ वर्षाकरीता परीक्षा पात्रतेचे निर्णय अमंलात आणणे अपेक्षित आहे. यास्तव यापूर्वी देणेत आलेल्या नियमावलीमधील सवलत पुन:श्च देणे शक्य नाही. यास्तव सदर निर्णयाची अमंलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून कटाक्षाने करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. याबाबतची वस्तुनिष्ठ संपूर्ण माहिती सर्व संबंधित घटक जसे, विद्यार्थी, प्राध्यापक व पालक यांना देण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक

प्रत माहितीकरीता मानार्थ:-

१) मा. कुलगुरु कार्यालय २) मा. संचालक, बी.सी.यु.डी.कार्यालय ३) मा. कुलसचिव कार्यालय